संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# उपनगरीय रेल्वेच्या रडकथा सुरूच

मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय महानगरीच्या समस्या सोडविण्यासाठी आपण प्राधान्य देणार असल्याचे नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. परंतु हे तितकेसे सोपे नाही. कारण गेल्या आठ दिवसांमध्ये मुंबईतल्या तीनही रेल्वे मार्गावर काहीना काही गोंधळ होत गेला आणि मुंबईतल्या लाखो चाकरमान्यांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. विशेषतः मध्य रेल्वेने याबाबत उच्चांक गाठला आणि सलग तीन दिवस रेल्वे मार्गावर काहीना काही बिघाड होत राहिला. दोन वेळा रेल्वे रुळांवरून डबे घसरण्याचा प्रकार तर एका ठिकाणी रुळाला तडा जाण्याची घटना घडल्यामुळे सतत तीन दिवस उपनगरीय रेल्वे सेवा विस्कळीत होत राहिली. विशेषतः गेल्या काही दिवसांपासून तीनही मार्गावरील वेळापत्रक कोलमडले आहे. कोणतीही उपनगरीय गाडी ठरलेल्या वेळी येत नसल्याच्या तक्रारी सुरू आहेत. या पध्दतीने मुंबई महानगरातल्या रेल्वे सेवेचे तीनतेरा वाजत असतील तर इथल्या प्रवाशांनी रामभरोसे प्रवास केलेला बरा असेच म्हणावे लागेल. कोणत्या क्षणी रेल्वे सेवेचा कसा गोंधळ होईल किंवा ती कशी बंद पडेल याचाही कोणताच भरोसा देता येत नाही. या सगळ्या गैरकारभाराला रेल्वे विभाग जबाबदार आहे यात काही शंका नाही कारण दर रविवारी मेगाब्लॉक घेतला जातो. कुठेही तांत्रिक बिघाड होऊ नये आणि रेल्वे सेवा सुरळीत चालू राहावी याची खबरदारी घेतली जाते तरीदेखील जर काही ना काही कारणावरून उपनगरीय सेवा विस्कळीत होत असेल तर त्याचा दोष स्वाभाविकपणे रेल्वे प्रशासनाकडे जातो. ज्या उपनगरीय सेवेचा तब्बल ४५ लाख लोक उपयोग करतात. त्या ठिकाणी जर रेल्वे प्रशासनाकडून योग्य ती काळजी घेतली जात नसेल तर त्याची जबाबदारी रेल्वे प्रशासनाकडेच जाते. त्याच त्या कारणामुळे रेल्वे सेवा विस्कळीत झाल्यामुळे प्रवाशांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. एकीकडे मुंबई ही आधुनिक महानगरी म्हणायचे तिची तुलना शांघाय आणि लंडन शहरांशी करायची परंतु इथली साधी रेल्वे सेवा कार्यक्षम ठेवण्याबाबत ढिसाळपणा दाखवायचा असा विरोधाभास पाहायला मिळतो. या दोन शहरांमध्ये स्थानिक रेल्वे सेवा इतक्या व्यवस्थित आणि आधुनिक आहेत की, त्या ठिकाणी अशाप्रकारचे तांत्रिक बिघाड ५-१० वर्षातून एकदाच घडतात. याप्रकारची कार्यक्षमता मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवेबाबत ज्यावेळी दिसून येईल. त्यावेळी खऱ्या अर्थाने मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे असे म्हणता येईल.

### रेल्वेचा ढिसाळपणा

मुंबईत सामान्य माणूस या रेल्वे सेवेचा उपयोग करतो म्हणून त्याकडे दुर्लक्ष होते असा आमचा आरोप आहे. जर या उपनगरीय रेल्वेतून मंत्र्यांनी किंवा श्रीमंत वर्गाने प्रवास केला तर हीच रेल्वे सेवा अत्याधुनिक आणि कार्यक्षम ठेवण्याकडे लक्ष दिले गेले असते. अशा प्रकारचा गोंधळ तुम्हाला विमानतळावर फारसा पाहायला मिळणार नाही. कारण तिथली सेवा पैसेवाल्यांसाठी तत्पर ठेवली जाते. सगळ्या प्रकारच्या सोयीसुविधा पुरविल्या जातात. या ठिकाणी जर अशा पध्दतीने सलग २-३ दिवस गोंधळ उडाला तर त्याची लागलीच दखल घेतली जाते आणि त्याच्यावर जबाबदार असण्यावर ताबडतोब कारवाईदेखील केली जाते. तसे रेल्वे सेवेबाबत होत नाही. आजही मुंबईतल्या उपनगरीय रेल्वे स्थानकावर इतक्या गैरव्यवस्था आहे की, सामान्य जनता नाईलाजाने सहन करते. अगदी अस्वच्छतेपासून तिकीट काढण्यासाठी लांबचलांब रांगा लावण्यापर्यंत प्रवाशांना तोंड द्यावे लागते. आज माहिती तंत्रज्ञानाने इतक्या विविध प्रकारच्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत की, अनेक कामे ही संगणकाच्या माध्यमातून पार पाडता येऊ शकतात. मुंबईची उपनगरीय सेवा सिग्नल यंत्रणेतल्या बिघाडामुळे किंवा ओव्हरहेड वायर तुटण्याच्या प्रकारामुळे विस्कळीत होते. या वारंवार घडणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करता येऊ शकतात किंवा त्याची पर्यायी व्यवस्था करता येऊ शकते. परंतु तेवढीसुध्दा आधुनिकता मुंबईच्या उपनगरीय रेल्वेसेवेत आलेली नाही. अगदी लोकलच्या एखाद्या डब्यात साखळी ओढली गेली आणि त्याची माहिती पुढच्या स्टेशन मास्तरला कळविण्यासाठी मोटरमनकडे फोनची किंवा मोबाइलचीसुध्दा उपलब्ध नाही. स्टेशनमध्ये गाडी आल्यावर मोटरमन व्हॅन वाजवून साखळी ओढली गेल्याची माहिती स्टेशन मास्तरला देतो. यावरून रेल्वे कारभारातला ढिसाळपणा दिसून येतो. या साध्या साध्या गोष्टींमध्ये रेल्वेला सहजपणे आधुनिकता आणता येऊ शकते. तीदेखील करता येऊ नये याचे आचर्य वाटल्याशिवाय राहत नाही.

### मुंबईकरांचा अपमान

केंद्रामध्ये मोदी सरकार आल्यापासून मुंबईतली उपनगरीय सेवा रुळावरून चांगली घसरली आहे. कारण गेल्या आठवड्यांमध्ये लागोपाठ घडलेले प्रकार रेल्वे सेवेचे तीनतेरा वाजवणारे ठरले. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना त्यांची दखल घ्यावीशी वाटली नाही. उपनगरीय रेल्वे सेवेचा किती लाख प्रवासी उपयोग करतात. यापेक्षाही या रेल्वेसेवेचा सामान्य माणूस उपयोग करतो म्हणूनच त्याकडे रेल्वे मंत्र्यांना लक्ष द्यावेसे वाटलेले नाही. प्रचंड गर्दीमध्ये रोज जीवघेणा प्रवास करण्याची वेळ सामान्य मुंबईकरांवर येत असते. त्याला दिलासा देण्याच्या कोणत्याही ठोस उपाययोजना रेल्वेने केलेल्या नाहीत. नवे सरकार आल्याचा कोणताही चांगला अनुभव मुंबईच्या रेल्वे प्रवाशांना मिळालेला नाही. हा ढिसाळपणा जर असाच चालू राहिला तर मुंबईकरांनी ज्यासाठी भरघोस मतदान केले त्याचाच अपमान झाल्याचे म्हणावे लागेल. त्याच त्याच समस्या पुन्हा पुन्हा निर्माण होतात आणि त्या सोडवण्याची रेल्वेकडे वेगवान यंत्रणाच नसावी. हे धक्कादायक ठरते. कुठलाही तांत्रिक बिघाड झाल्यानंतर जास्तीत जास्त अर्ध्या तासामध्ये मदत पथक तिथे पोहचले पाहिजे. आणि पुढच्या तास-दीड तासात सगळी दुरुस्ती पूर्ण होऊन रेल्वे वाहतूक सुरळीत झाली पाहिजे. परंतु परदेशातल्या अनेक मोठ्या शहरांमध्ये असलेली रेल्वेची तातडीची उपाययोजना मुंबईसारख्या तितक्याच महत्त्वाच्या महानगरामध्ये अजूनही रेल्वे खात्याला निर्माण करता आलेली नाही.